फुलशेती

# नफ्याची गोष्ट सांगणारी
# 'बोलकी' अबोली

**प्रा. भूषण तायडे**
(मो.न. ९७६६८०८३२४)
क.का. वाघ उद्यानविद्या
महाविद्यालय, नाशिक



प्रामुख्याने दक्षिण भारतात अबोलीच्या फुलझाडाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अबोलीची फुले मुख्यतः वेण्या, गजरे आणि केशशृंगाराची आभूषणे बनविण्यासाठी वापरतात. सुगंधित नसली तरी आकर्षक रंग व हलकेपणा यामुळे त्यांना भरपूर मागणी असते. महाराष्ट्राचा विचार केला असता कोकणात साधारणपणे प्रत्येक घराभोवती थोड्याफार प्रमाणात अबोलीच्या फुलझाडांची लागवड केलेली दिसून येते. व्यापारीदृष्ट्या अबोलीची लागवड करणे फायद्याचे आहे.

अबोलीची  झाडे बहुवर्षीय असतात व ती झुडुपासारखी वाढतात. खोडांवर अनेक फांद्या फुटून फांद्यांच्या टोकावर फुले येतात.  अबोलीच्या फुलांना नारिंगी पिवळ्या गर्द नारिंगी अशा विविध छटा असून या फुलांना आकर्षक रंग,  हलकेपणा आणि टिकाऊपणा असतो, त्यामुळे ही फुले अत्यंत लोकप्रिय आहेत.

प्रामुख्याने दक्षिण भारतात अबोलीच्या फुलझाडाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अबोलीची फुले मुख्यतः वेण्या, गजरे आणि केशशृंगाराची आभूषणे बनविण्यासाठी वापरतात. सुगंधित नसली तरी आकर्षक रंग व हलकेपणा यामुळे त्यांना भरपूर मागणी असते. महाराष्ट्राचा विचार केला असता कोकणात साधारणपणे प्रत्येक घराभोवती थोड्याफार प्रमाणात अबोलीच्या फुलझाडांची लागवड केलेली दिसून येते. व्यापारीदृष्ट्या अबोलीची लागवड करणे फायद्याचे आहे.

अबोलीचे उगमस्थान आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि भारत हे देश आहेत. महाराष्ट्रामध्ये ठाणे जिल्ह्यातील पालघर आणि वसई तालुक्यात अबोलीची लागवड आढळून येते.

**क्षेत्र :** भारतामध्ये अबोलीची लागवड आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांत काही प्रमाणात केली जाते.

**हवामान :** अबोली हे उष्ण हवामानातील पीक असले तरी उष्ण आणि समशीतोष्ण कटिबंधातील दमट हवामानात चांगले येऊ शकते. परंतु धुके, आणि कडक थंडी अथवा बर्फ पडणे पिकास मानवत नाही.

**जमीन :** या पिकासाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी आणि पोयटायुक्त तांबडी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.० ते ७.५ असावा. क्षार आणि चुनखडीयुक्त जमीन अबोलीस अयोग्य असते.

फुलांच्या रंगांवरून अबोलीच्या प्रमुख चार जाती आहेत.

**नारिंगी :** या अबोलीची फुले नारिंगी रंगाची असून टिकाऊ असतात.

**गर्द नारिंगी :** या अबोलीचा रंग गर्द नारिंगी असतो. या जातीच्या झाडांना बिया धरत नाही.

**पिवळी :** या अबोलीची फुले नारिंगी पिवळ्या रंगाची असून आकर्षक असतात.

**तांबडी :** या जातीची फुले तांबड्या रंगाची असतात. झाडे कणखर आणि सूत्रकृमी या किडीला प्रतिकारक असतात.

तामिळनाडू कृषी विद्यापीठ, कोईमतूर येथे अबोलीच्या दोन नवीन संकरित जाती विकसित केल्या आहेत. पहिल्या जातीची फुले पिवळसर नारिंगी रंगाची असून, ती जात कणखर सूत्रकृमी बुरशी यांना मोठ्या प्रमाणात प्रतिकारक आहे. दुसरी जात ही गर्द गुलाबी रंगाची आहे. महाराष्ट्रात मात्र नारिंगी आणि पिवळ्या फुलांच्या जातीच लोकप्रिय आहेत.

## अभिवृद्धी

अबोलीची अभिवृद्धी बियांपासून किंवा छाट कलमे करून केली जाते. अबोलीच्या एक हेक्टर लागवडीसाठी सुमारे ५ ते ६ किलो बियाणे लागते. अबोलीच्या काही जातींना बिया धरत नाहीत. तसेच पर परगीकरणामुळे बियांपासून मातृवृक्षासारखी रोपे मिळत नाहीत. अशा वेळी छाट कलमांनी रोपे जून-जुलै महिन्यात तयार करावीत.

**लागवड :** अबोलीची लागवड सपाट अथवा साऱ्यांवर करावी. लागवडीसाठी जमीन २ ते ३ वेळा नांगरून दरहेक्टरी २० ते २५ टन चांगले कुजलेले शेणखत घालून कुळवणी करावी. साऱ्यांवर अबोलीची लागवड ऑगस्ट ते ऑक्टोबरपर्यंत करावी. लागवडीचे अंतर ६० X÷३० सें.मी. ठेवावे.

**छाटणी :** दरवर्षी जून महिन्यात अबोलीच्या रोपांची छाटणी करतात. छाटणी केल्यामुळे रोपांची उंची कमी होते आणि त्यांना भरपूर फुटवे येतात त्यामुळे फुलाचे उत्पादन वाढते.

**खते :** अबोली हे अनेक वर्षे वाढणारे फुलझाड असून त्यापासून जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी दर हेक्टरी दरवर्षी १०० किलो नत्र ६० किलो स्फुरद  व ६० किलो पालाश जमिनीतून द्यावे.

**पाणी :** अबोलीच्या  पिकाला जमिनीच्या  मगदुरानुसार हिवाळ्यात ५ ते ७ दिवसांनी आणि उन्हाळ्यात ३ ते ४ दिवसांनी पाणी द्यावे. पावसाळ्यात रोपांजवळ पाणी साचू देऊ नये.

**कीडनियंत्रण :** अबोलीच्या पिकावर प्रामुख्याने खवले कीड, पांढरी माशी,  आणि पिठ्या ढेकूण या किडींचा उपद्रव होतो. या किडींच्या नियंत्रणासाठी १० लि. पाण्यात १७ मि.लि. फोसेलोण किंवा १२ मि.लि. मॅलेथिऑन या प्रमाणात मिसळून पिकावर फवारावे.

**रोगनियंत्रण :** अबोलीच्या पिकावर पडणाऱ्या प्रमुख रोगांमध्ये बुरशी आणि सूत्रकृमी यांच्यामुळे होणारी रोपांची मर हा महत्त्वाचा रोग आहे. या रोगामुळे अबोलीच्या झाडाच्या पानांच्या कडा पिवळ्या पडतात. पानगळ होते व मुळेही कुजतात. ही रोगट मुळे खोडासकट काढून  जाळून टाकावीत. रोगाची लक्षणे दिसल्यास जमिनीत बुंध्याजवळ १% बोर्डो मिश्रण किंवा ०.३% ब्रॅसिकोल या बुरशीनाशकाचे ५०  मि.लि. द्रावण ओतावे.

**फुलांची काढणी उत्पादन :** अबोलीची रोपे लावल्यनंतर ४ ते ५ महिन्यांत फुले येऊ लागतात. ही फुले वर्षभर मिळत असतात. परंतु जास्तीत जास्त उत्पादन हिवाळी हंगामात मिळत असते. पावसाळ्यात फुलांचे उत्पादन कमी असते. अबोलोची फुले तुऱ्यात येतात आणि सर्व फुले उमलण्यास १५ ते २० दिवस लागतात. उमललेली फुले ही झाडावर ३ दिवस व तोडलेली फुले २ दिवस चांगल्या प्रकारे टिकतात. फुलांचे उत्पादन दुसऱ्या वर्षापासून चांगले मिळते आणि दरहेक्टरी सुमारे ३ ते ४  टन फुले मिळतात. ■